# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.05.2025** **वारःबुधवार**

1. भारतीय सैन्यदलाकडून मध्यरात्री राबविलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्ये 9 दहशतवादी तळ उद्ध्वस्त
2. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर देशात 244 ठिकाणी आज युद्धस्थितीतला नागरी संरक्षण सराव होणार; राज्यातल्या 16 ठिकाणांचा समावेश
3. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबवण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय; विविध धार्मिक स्थळांच्या विकासासाठी 5 हजार 503 कोटी रुपयांच्या प्रकल्पांनाही मान्यता आणि
4. सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची पदकांची लयलूट

**<u>ऑपरेशन सिंदूर</u>**

पाकिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमधील ज्या दहशतवादी तळांवरून भारताविरोधी दहशतवादी कारवायांचे कट रचण्याचं आणि हल्ले घडवून आणण्याचं काम चालवलं जातं असे तळ भारतीय सैन्यदलांनी मध्यरात्रीपासून सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेत उद्ध्वस्त केले आहेत. या मोहिमेत नऊ तळांना लक्ष्य करण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. ही अत्यंत काळजीपूर्वकपणे आणि कुठलाही तणाव निर्माण न होता ही मोहीम राबविण्यावर भर देण्यात आला होता. यामध्ये पाकिस्तानी सैन्याच्या कोणत्याही तळाला लक्ष्य करण्यात आलं नसल्याचंही निवेदनात म्हटलं आहे. पहलगाम इथे नुकत्याच झालेल्या निर्घृण हल्ल्यानंतर अनेक पावलं उचलण्यात आली असून त्या अंतर्गत ही कारवाई केल्याचं संरक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलं.

मध्यरात्री कारवाई सुरू असताना - पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यावर पूर्णवेळ देखरेख ठेवून होते. भारतीय सैन्यानं हाती घेतलेल्या या ऑपरेशन सिंदूरबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'भारतमाती की जय' अशी प्रतिक्रिया एका समाजमाध्यमावर नोंदवली आहे. सिंदूर या लष्करी मोहिमेची सविस्तर माहिती देण्याकरता भारतीय लष्कराच्या वतीनं आज सकाळी दहा वाजता पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे.

दरम्यान भारतानं दहशतवाद्यांच्या तळावर केलेल्या हल्ल्यावर 'काहीतरी घडणार आहे, याची लोकांना कल्पना होती' अशी प्रतिक्रिया अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव लवकरच संपेल अशी आशा असल्याचंही ट्रम्प म्हणाले. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्कोरुबिओ यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील स्थितीवर आपणं बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं म्हटलं आहे. शांततापूर्ण तोडगा निघावा यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष दोन्ही देशांच्या नेतृत्वाशी चर्चा सुरू ठेवतील असंही त्यांनी पुढे सांगितलं.

**<u>मॉकड्रिल</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धसदृश स्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून सुसज्ज राहण्याच्या उद्देशानं केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यांना आज मॉक ड्रिल म्हणजेच युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश दिले आहेत. देशभरातल्या 244 नागरी प्रभागांमधे हा सराव होणार आहे. राज्यात मुंबई, उरण, तारापुर , ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धाटाव-नागोठाणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या 16 ठिकाणी - हा सज्जता सराव होणार आहे. यात हवाई हल्ल्याच्या वेळी वाजवला जाणारा सायरनही  वाजवला जाणार आहे. हल्ला झाल्यास कोणत्या स्वरूपाच्या हालचाली करायच्या या विषयी नागरिकांना, विशेषतः

विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं; तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणं हा, या सरावाचा भाग आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. यामध्ये जिल्हा प्रशासनाच्या विविध यंत्रणा कार्यरत असतील तसंच या सज्जता-सरावात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मास्टर-ट्रेनर म्हणून प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचं पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. या संदर्भात अधिक माहिती देताना ते म्हणाले....

**मॉकड्रील जे आहे ते तीन ठिकाणी होणार आहे, पुणे कौन्सिल हॉल मध्ये एक तळेगाव नगर परिषदेमध्ये आणि तिसरा मुलाशी पंचायत समिती मध्ये मॉकड्रील मध्ये वेगवेगळ्या विभागांचा समावेश असणार आहे, याचा उद्देश दोन आहे कि लोकांमध्ये आपण जनजागृती करू की उद्या जर आपला दुश्मन आपल्या देशाबरोबर युद्ध झाला तर काय काय काळजी घेतली पाहिजे या धरतीवर आपण हा मॉकड्रील घेत आहोत.**

दरम्यान पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठका सुरू आहेत. पंतप्रधानांनी काल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी आणि लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासोबत पंतप्रधानांनी स्वतंत्र बैठका घेतल्या.

**<u>पंतप्रधान</u>**

जगातलं एक महत्त्वाचं व्यापार आणि वाणिज्य केंद्र बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल सुरु असून, भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करारामुळे व्यापार आणि एमएसएमई क्षेत्रासाठी अनेक नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते काल नवी दिल्लीत एका खासगी वृत्त वाहिनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. केंद्र सरकारनं मानव केंद्रित वैश्विकरणाचं धोरण स्वीकारलं आहे; त्यामुळे आपल्याकडे विकासाचं मोजमाप केवळ बाजारातील चढ-उतारांवर नाही; तर सामान्य नागरिकांच्या; स्वाभिमानाने जगण्याच्या आणि स्वप्न पूर्ण करण्याच्या क्षमतेवर ठरतं, असं ते म्हणाले. भारताच्या हक्काचं पाणी आधी भारताबाहेर जात होतं, मात्र आता भारतातील पाणी भारतातच वाहणार आणि भारताच्याच उपयोगी पडणार; असं सूचक विधानही पंतप्रधानांनी केलं.

**<u>स्थास्व निवडणूक</u>**

राज्यात 2022 पासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी 4 महिन्यांत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. जुलै 2022मध्ये बाठिया आयोगाचा अहवाल येण्याआधी ओबीसी आरक्षणाबाबत जी तरतूद होती त्यानुसार या निवडणुका घ्याव्यात असं, न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या पीठानं काल सांगितलं. तसेच 4 आठवड्यांच्या आत निवडणुकीसदर्भातील अधिसूचना काढण्यात यावी असं देखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

**<u>मंत्रिमंडळ</u>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी, म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी इथे काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. यात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राज्यातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी 5503 कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. चौंडी इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या जतन आणि संवर्धनासाठी सुमारे 681 कोटी रुपयांच्या निधीला यावेळी मंजुरी देण्यात आली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान आणि आदिशक्ती पुरस्कार योजना सुरु करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. आदिशक्ती अभियानासाठी साडे दहा कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली. नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा प्राधीकरण अध्यादेश-2025 जारी करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्रिमंडळातील सर्व मंत्री तसंच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**वसंत व्याख्यानमाला-सांगली**

सांगलीतील मिरज विद्यार्थी संघातर्फे आयोजित शतक महोत्सवी वसंत व्याख्यानमालेचं उद्घाटन नुकतंच विद्यावाचस्पती शंकरराव अभ्यंकर यांच्या हस्ते करण्यात आलं. 2 मे पासून सुरू झालेली व्याख्यानमाला 17 मे पर्यंत चालणार आहे. 1925 पासून आजपर्यंत अखंडपणे ही व्याख्यानमाला सुरू आहे. प्र. के. अत्रे, वि. स. खांडेकर, यशवंतराव चव्हाण, मंगेश पाडगावकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, अशा दिग्गजांनी या व्याख्यानमालेमध्ये आपले विचार मांडले आहेत. या शतक महोत्सवी वसंत व्याख्यानमाले विषयी सांगताना अध्यक्ष डॉ. मुकुंदराव पाठक म्हणाले.....

**दरवर्षी उत्तमोत्तम बोलोणे निरनिराळ्या विषयावरच ज्ञान लोकांना द्यावं. हा याचा हेतू आहे या व्याख्यान मालेला एक निराळ रूप प्राप्त आहे. आणि लोक चौकशी करतात की यंदा आम्हाला संधी मिळेल का आणि लोकां कडून सूचना पण येतात की आमुक वक्त्याच भाषण ठेवावं यामध्ये निवड जानेवारी फेब पासून आम्ही करतो. निरनिराळ्या वक्त्यांच्या डेट्स ठरून में महिन्याच्या दोन तारखेपासून पंधरा दिवसांचीही व्याख्यानमाला सलगपणे चालू आहे दहा हजारांपेक्षा जास्त वक्त्यांची भाषण या सभाग्रहात झालेली आहे. या सर्व गोष्टीच क्रेडिट मिरजेच्या श्रोत्रू वर्गाला जात सातत्याने श्रोते उपस्थित राहतात आपल्या भाषणानंतर निरनिराळे प्रश्न विचारून आपलं ज्ञान वाढवून घेतात.**

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत कालच्या तिसऱ्या दिवशी देखील महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. सिद्धेश घोरपडेने सायकलिंकच्या स्क्रॅचरेस प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिलं. जलतरण क्रीडा प्रकारात आदिती हेगडे हिने सलग दुसऱ्या दिवशी सुवर्ण पदकांची हॅटट्रिक नोंदवत स्पर्धेत एकंदर 5 पदकं पटकावली. जलतरणामध्ये मुलींनी फ्री स्टाईल रिलेमध्ये सुवर्ण पदकाला गवसणी घातली. मल्लखांब क्रीडा प्रकारात पुरुष गटात महाराष्ट्र संघाने सलग सातव्यांदा रौप्य पदक पटकावलं. याशिवाय सायकलिंगमध्ये आकांक्षा म्हेत्रे, जुदो क्रीडा प्रकारात श्रावणी डिके यांनीही रुपेरी कामगिरी केली. खो खो मध्ये महाराष्ट्राच्या मुली आणि मुले या दोन्ही संघांची विजयी घोडदौड कायम आहे. या स्पर्धेत पदक तालिकेत सध्या महाराष्ट्र अव्वल स्थानी असून महाराष्ट्राच्या खात्यात आत्तापर्यंत सहा सुवर्ण चार रौप्य आणि नऊ कास्य अशी 19 पदकं आहेत.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.